प्रेस नोट दिनांक १७/०३/२०२३

**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी, जि. ठाणे, येथील लिपीक बाळा नारायण जाधव यांना लाच स्विकारताना ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने घेतले ताब्यात.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | ठाणे विभाग |
|---|---|
| स्टेशन डायरी क. | नों.क. २४ - १७.५५ वा. निजामपूर पोलीस स्टेशन भिवंडी, ठाणे शहर. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध (संशोधन २०१८) अधिनियम १९८८ चे कलम ७ प्रमाणे. |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | बाळा नारायण जाधव, वय ५२, पद- लिपीक (वर्ग-३), नेमणूक - भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी, जि.ठाणे. |
| मागितलेल्या लाचेची रक्कम | ३०,०००/-रुपये लाचेची मागणी करुन रु. १५,०००/- ते रु. २०,०००/- रुपये रुपये घेवून येण्यास सांगून ते स्विकारण्याचे मान्य केल व उर्वरीत रक्कम काम झाल्यानंतर स्विकारण्याचे मान्य केले. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १५,०००/-रुपये |
| थोडक्यात हकिकत | यातील तक्रारदार यांच्या वडिलांनी सफाई कामगार या पदावरुन भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी येथून स्वेच्छा निवृत्ती घेतली आहे. तक्रारदार यांनी त्यांच्या वडीलांच्या स्वेच्छा निवृत्ती नंतर सदर ठिकाणी वारसाहक्काने त्यांना नोकरीत सामावून घेण्यासाठी दि. ०६/०३/२०२३ रोजी अर्ज केला होता. सदर अर्जाच्या अनुषंगाने तक्रारदार हे लोकसेवक बाळा जाधव यांना दि. १५/०३/२०२२ रोजी भेटले असता त्यांना वडीलांच्या जागेवर वारसाहक्काने कामावर घेण्यासाठी भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका येथील लोकसेवक बाळा जाधव, लिपीक यांनी स्वत:साठी तक्रारदार यांचेकडे ३०,०००/- रु. मागितले परंतु तक्रारदार यांना लोकसेवक बाळा जाधव यांना लाच दयावयाची नसल्याने त्यांनी दि. १६/०३/२०२३ रोजी लोकसेवक बाळा जाधव यांनी ३०,०००/- रु. लाचेची मागणी करीत असल्याबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयात लेखी तक्रार नोंदवली.<br>सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि. १७/०३/२०२३ रोजी करण्यात आलेल्या पडताळणीदरम्यान लोकसेवक बाळा नारायण जाधव यांनी ३०,०००/-रू लाचेच्या रक्कमेची मागणी करुन १५,०००/- ते २०,०००/- रुपये घेवून येण्यास सांगून ते स्विकारण्याचे मान्य केले व उर्वरीत रक्कम काम झाल्यानंतर स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाल्यानंतर लगेच लाचेच्या सापळयाचे आयोजन केले असता, लोकसवक बाळा नारायण जाधव, पद - लिपीक, वर्ग - ३, नेमणूक - भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी, जि. ठाणे यांना भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी कार्यालयात तक्रारदार यांचेकडून रु. १५,०००/-(पंधरा हजार रुपये) इतकी लाचेची रक्कम स्विकारली असता, रंगेहाथ पकडून ताब्यात घेण्यात आले असून लाचेची रक्कम लोकसेवक यांचेकडून हस्तगत करण्यात आली आहे. |

लाचलुचपत प्रतिबधंक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता :- **ला.प्र.वि., ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम, ४००६०१**
संकेतस्थळ :- acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई-मेल :- spacbthane@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net
टोल फ्री नं :- १०६४
दुरध्वनी क्र. :- ०२२-२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉटस् ॲप क्र. :- ९९३०९९७७००

पोलीस निरीक्षक ॲन्टी करप्शन ब्यूरो, ठाणे

(जगदीश गावीत)
पोलीस निरीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे